REVIEW OF RESEARCH
ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
VOLUME - 14 | ISSUE - 10 | JULY - 2025

# दलित कादंबरीतील दलित स्त्री-पुरुष व्यक्तिरेखा

श्रीमती. रुक्मिन किशनराव वाघमोडे
रा.कुर्डूवाडी ता.माढा जि.सोलापूर

**प्रास्ताविक :**



दलित कादंबरीने आपल्या वेगळेपणामुळे मराठीसाहित्यात आपले भक्कम स्थान निर्माण केले.कादंबरीतील भाषा, मांडणी, अनुभव याबरोबरच कादंबरीतील व्यक्तिरेखांचे वेगळेपण हे लक्षवेधी ठरते.यामुळेच दलित कादंबरी इतर कादंबरीच्या तुलनेत आपले अस्तित्व सिद्धकरताना दिसते.दलित कादंबरीचा आशय, विषय, अनुभव इतर कादंबरीपेक्षा वेगळा आहे; तोकाल्पनिक पातळीवर स्थिर न राहता वास्तवाच्या परिघावर गतिमानहोताना दिसतो.दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा ह्या ग्रामीण, शहरी जीवनातल्या खचलेल्या आहेत, पिळलेल्या आहेत.हजारो वर्षापासूनचे वर्णव्यवस्थेचे अमानवी वण सोबत घेऊन त्या जगताना दिसतात.गावगाड्यातले अमानवी, लाचार जिणे जगणाऱ्या व्यक्तिरेखा पारंपरिकगुलामीचे, जोखड झुगारताना दिसतात.दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा कालानुरुप बदलतात.स्वातंत्र्यपूर्व काळातल्या व्यक्तिरेखा गावगाड्यातला हा अन्याय, अत्याचार निमूटपणे जगताना दिसतात. दुःख, वेदना यांच्याशीहातमिळवणी करुन आयुष्याशीतडजोडकरत त्या जगत राहतात. त्यांच्या जाणीवा ह्या बोथट असलेल्या दिसतात.गावगाड्यातील बलुतेदारी करुन वेळप्रसंगी उपाशी राहून, कष्ट करुनही त्यांच्या जीवनात बदल होताना दिसत नाही.याच अवस्थेत हे लाचार, अमानवी जीवन जगताना त्या दिसतात. आपण 'माणूस' आहोतही भावना त्यांच्या ठायी अभावानेच दिसते. परंतु डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचया उदयानंतर त्यांच्या चळवळीनंतर गावगाड्यातील दलितजीवनावर याचा मोठा प्रभाव पडल्याचे दिसते.'शिकासंघटीत व्हा संघर्ष करा' हा विचार खेड्यापाड्यातील दलित समाजाच्या जगण्याचा मूलमंत्रठरला; आणि दलित समाज डॉ.आंबेडकरांच्या विचारांपी प्रभावित होऊनहेगुलामीचे जोखड झुगारुन टाकूल लागला. अमानवी, लाचार जीवनाचा त्याग करुन स्वाभिमानाने जीवन जगण्यासाठी धडपडू लागला. डॉ.आंबेडकरांच्या धर्मांतरातून प्रेरणा घेऊन दलित समाज हिंदू धर्मातीलकर्मकांड, दैववाद, परंपरा यांना तिलांजली देऊन परिवर्तनाचे नवे विचार आत्मसात करु लागला. हीगोष्ट प्रस्थापित कर्मठ विचार असणाऱ्या समाजाला पचणारी नव्हती.यातून गावगाड्यापासून शहरापर्यंत दलित आणि सवर्ण या दोन्ही समाजामध्ये मोठा संघर्ष निर्माण झाला.दलितसमाजातील शिकलेली नवी प्रतिभावंत पिढीने याचा समाचार आपल्या लेखणीने घेतला.यातूनकथा, कविता, कादंबरी यांना आशय, विषय आणि वास्तव अनुभवाचे साहित्य द्रव्य उपलब्ध झाले.याच संघर्षातून दलित कादंबरीचा विस्तृत पट आकाराला आला.याचा संघर्षाचे नायक, कादंबरीतील व्यक्तिरेखा ठरल्या.दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा ह्या प्रत्येक टप्प्यावर बदलाताना दिसतात.सुरुवातीच्या काळात दलित कादंबरीतील व्यक्तिरेखांपेक्षा १९७० नंतरच्या दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा अधिक बंडखोर, स्वाभिमानी आणि आंबेडकरी चळवळींची विद्रोही भाषा बोलताना दिसतात. डॉ.आंबेडकरांच्या विचारांचा खूप मोठा प्रभाव एकूणच त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर पडलेला दिसतो. संघर्षाबरोबरच आंबेडकरी विचारांना आपल्या जीवनात मोठे स्थान दिल्याचे दिसते.'माणूस' असल्याची जाणीव त्यांच्या ठायी दिसून येते.मानवी मूल्यांसाठी प्राणपणाने लढणाऱ्या व्यक्तिरेखा दलित कादंबरीतून दिसून येतात.

**दलित कादंबरीतील व्यक्तिरेखांचे स्वरुप :**

दलितकादंबरीतून दलित जीवनाचे चित्रण मोठ्या प्रमाणात झालेले आहे.इतर कादंबरीच्या तुलनेत दलित कादंबरीतून येणाऱ्या व्यक्तिरेखांचे स्वरुप पूर्ण अंशी भिन्न आहे. दलित कादंबरीच्या कथानकाशी आशयाशी या व्यक्तिरेखा पूर्णतः एकूरुप झालेल्या दिसतात. कादंबरीचा अवकाश, काळ, आशय या सर्व गोष्टींना जोडून ठेवण्याचे महत्त्वपूर्ण काम व्यकितरेखा करतात.दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा कादंबरीकाराच्या जीवनानूभवाशी तादात्म्य पावून कादंबरीला एकसंघ ठेवण्याचे कामकरतात.कादंबरीतील सर्व घटकांना या व्यक्तिरेखा बांधून

ठेवतात. आशय आणि निवेदन यांचे जिवंतपण व्यक्तिरेखांवरतीच अवलंबून असते. लेखकाच्या मनोअवस्थेचा खून मोठा भाग या व्यक्तिरेखा असतात.याबाबत डॉ.सुशीलाढगे यांचे मन विचारात घेण्यासारखे आहे "प्रसंग हे स्वयंभू नसतात ते व्यक्तीच्या किंवा समाजाच्या समस्येतून निर्माण होणाऱ्या प्रश्नांशी निगडीत असतात.मुख्य विरोधी व्यक्तिंचे हेतू एकमेकांवर घासलेगेलेतर त्या प्रसंगाचा उद्‌भव होतो.म्हणजे व्यक्ती ह्या प्रसंगाच्या कारक असतात.प्रसंगाची मांडणीकरण्यापेक्षा ज्यांच्या परस्पर घर्षणाणे प्रसंग आपोआप निर्माण होतील अशा व्यक्तिचित्रणाची कादंबरीत अधिकगरत असते."[१](पृ.क्र. १८९) दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा ह्या प्रसंगानुरुप दलित कादंबरीत अनिवार्य होतात.कादंबरीचा आशय आणि अभिव्यक्ती यांना जोडण्याचे प्रभावी काम या व्यक्तिरेखा करताना दिसतात.कादंबरीतील निवदेन, भाषा यांना जिवंतपणा आणि प्रवाहीपणा हा या व्यक्तिरेखांमधून मिळतो.लेखकाच्या कल्पकतेतूनसाकार झालेल्या त्या व्यक्तिरेखा कादंबरीत मात्र वास्तव स्वरुपात प्रकटहोतात.लेखकाच्या आशयाला न्याय देण्याचे महत्त्वाचे कार्य या व्यक्तिरेखा पार पाडतात.इतर कादंबरीच्या तुलनेत दलित कादंबरीत येणाऱ्या व्यक्तिरेखा ह्या प्रसंगानुरुप आणि परिस्थितीजन्य स्वरुपात समोर येतात.दलित कादंबरी दलित जीवनाचा परामर्श घेत असते.तद्‌नुषांगिक दलित कादंबरीतील पात्रे दलित जीवन वाट्याला आलेली, गावकुसाबाहेरील उपेक्षित, जीवन वाट्याला आलेली, बलुतेदाराची कामेकरणारी, काबाडकष्ट करुन आपली उपजीविका करणारे, वंचित, बहिष्कृत समाजातील अधिक आहेत. त्याचप्रमाणे या समूहावर अन्याय, अत्याचारकरणारी, शोषणकरणारी सवर्ण समाजातील पात्रेही तितकीच वास्तव स्वरुपात समोर येताना दिसतात.दलित कादंबरीच्या विविध कालखंडातील आशयसूत्रानुसार या व्यक्तिरेखा बदलताना दिसतात.सुरुवातीच्या कालखंडात अन्याय, अत्याचारसहनकरणारीही पात्रे डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारमंथनातून आत्मभान आणि स्वाभिमान आलेली दिसून येतात.आपणही माणूस असल्याची भावना त्यांच्या मनामध्ये रुजलेली दिसते.अन्याय, अत्याचाराविरुद्ध बंड करणारी विद्रोही भाषा बोलणारी ही पात्रे परिवर्तनाचा विचार समाजमनात पेरताना दिसतात.नकार, वेदना आणि विद्रोह या व्यक्तिरेखांचा स्थायिभाव असल्याचा दिसून येतो.स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय या मानवी मूल्यांचा जागरकरणाऱ्या या व्यक्तिरेखा आपल्या हक्कांसाठी रणसंग्राम उभा करताना दिसतात.डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या धर्मांतरामुळे त्यांच्यामध्ये नव्या विचारांची प्रेरणा जागृत झाल्याचे दिसते.तळागाळातील या सर्व व्यक्तिरेखा हिंदू धर्मातील अनिष्ठ परंपरा, कर्मकांड, अंधश्रध्दा यांना झुगारताना दिसतात.पिढ्यानपिढ्या शोषणकरणारी गावगाड्यातील बलुतेदारीच्या, शोषणाच्या विरोधात दंड थोपटणारी दिसतात.यासाठीची भयावह किंमत त्यांना मोजावी लागते.परंतुत्याची पर्वा तेकरत नाहीत.लाचार आणि अमानवी उपेक्षित जीवन जगण्यापेक्षा लढत आणि अन्यायालया प्रतिकारकरतमृत्यूला कवटाळताना दिसतात."शंभर दिवस शेळीहोऊन जगण्यापेक्षा एक दिवस वाघ होऊन जगा" हा आंबेडकरांचा विचार या व्यकितरेखा आपल्या जगण्याचा मूलभूत भाग बनवताना दिसतात.हजारो वर्षे अन्याय सहनकरीत गावकुसाबाहेरील आपल्या पूर्वजांच्या जगण्याचा, त्यांच्यावरील लादलेल्या सर्व अमानवी गोष्टींचा हिशोतते विचारताना दिसतात.स्वर्ग, नरक, पुनर्जन्म, कर्मकांड या सर्व गोष्टींना नाकारुन बौध्द तत्त्वज्ञानाशी आपली नाळ जोडताना दिसतात.बौध्द तत्त्वज्ञान हेच आपल्याला 'माणूस' म्हणून जगण्याचे स्वातंत्र्य देते.शिवाय इतरकोणीही येणार नाही, हा प्रयत्नवाद या व्यक्तिरेखांच्या ठायी दिसतो.'शिकासंघटीत व्हा संघर्ष करा' हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेला मूलमंत्र या व्यक्तिरेखांच्या जगण्याचा अविभाज्य भाग ठरतो.म्हणूनच शिक्षण घेऊन आत्मभान आलेली नवी पिढी या व्यवस्थेविरुद्ध आवाज उठवताना दिसते.दलित कादंबरीतील अनेकस्त्री-पुरुष व्यक्तिरेखा या सर्व गोष्टींना अनुसरुनच उभ्या असलेल्या दिसतात.दलित कादंबरीतील पुरुष व्यक्तिरेखा ह्या काबाडकष्ट करणाऱ्या समाजामध्येउपेक्षित वागणूक वाट्याला आलेल्या कष्टावर विश्वास असणाऱ्या बलुतेदारीची कामे निमूटपणेकरणाऱ्या, ताराळकी, येसकरी गावातील मेलेली जनावरे ओढणारी अशी सर्व दुय्यम कामेकरणारी आहेतही सर्व पुरुष व्यक्तिरेखा ह्या दलित कादंबरीच्या पहिल्या कालखंडातील आहेत. याचा कालखंडातील पुरुष व्यक्तिरेखा ह्या धाडसी आहेत, शरीराने पीळदार, गावकीची कामेकरत जगणारी ; परंतु स्वाभिमान आणि आत्मभान यांची जाणीव नसलेल्या आहेत. परंपरेने चालत आलेलीकामेकरीतती जगताना दिसतात.तर नव्या पिढीतील दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा शिक्षण घेऊन आत्मभान आलेल्या, जातीयव्यवस्थेला नाकारुन, आंतरजातीय विवाह करणाऱ्या, स्वाभिमानाने जगणाऱ्या, बंड करणाऱ्या, समाजप्रबोधनाचा, फुले, शाहू, आंबेडकर यांच्या विचारांचा जागरकरीतसमाजकार्यकरणाऱ्या आहेत. गावगाड्यातील राजकीय व्यवस्थेचा भाग होऊ पाहणाऱ्या, बौध्द धर्म, डॉ.आंबेडकरांचे विचार गावगाड्यात रुजवणाऱ्या या व्यक्तिरेखा वेळप्रसंगी आक्रमकहोऊन गावाशी संघर्ष करताना दिसतात. याविरुद्ध दलित कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखा ह्या समाजव्यवस्थेत स्त्री म्हणून आणि दलित म्हणून अशा दुहेरी शोषणाच्या बळी झालेल्या दिसतात.यासंबंध डॉ. ज्योती लांजेवार यांचे मत विचारात घेणे अधिकसंयुक्त वाटते, "दलित कादंबरीकार दलित स्त्रियांच्या समस्यांच्या अनुषंगाने जीभूमिका घेतोती भूमिका जात, वर्ग आणि स्त्री-दास्य या तिहेरी शोषणातूनतपासणे मला ईष्ट वाटते" [२] (पृ.क्र. ११) डॉ. ज्योती लांजेवार यांच्या या विधानांची सत्यता दलित कादंबरीतील स्त्री-व्यक्तिरेखांचा अभ्यास करतानासमोर येते.भारतीय समाजव्यवस्था स्त्रियांना दुय्यम स्थान देते.शिवाय दलितस्त्री म्हणून तिचेसमाजातील जगणे, आणि तिच्याकडे एक भोगवस्तू म्हणून पाहणे या सर्व गोष्टी दलित कादंबरीतील स्त्री व्यक्तिरेखांचा अभ्यास करताना दिसून येतात.दलितसमाजातील निराधार, आगतिक, काबाडकष्ट करणाऱ्या, विधवा, परितक्त्या अशा अनेक शोषित स्त्री-व्यक्तिरेखा दलित कादंबरीतून समोर येतात.दलितसमाजातील दिसायलासुंदर असणारीस्त्रीही गावातील प्रस्थापित समाजाला आपलीहक्काचीसंपत्ती वाटते.त्याच नजरेनेते तिच्याकडे पाहतात.लोककलावंत म्हणून तमाशात कामकरणाऱ्या स्त्रियांना तर, अशा अनेकगोष्टींनासामोरे जावे लागते.आपले पोट भरण्यासाठी नाचणाऱ्या या स्त्री-व्यक्तिरेखांच्या जीवनाची मोठी परवड झालेली अनेक दलित कादंबरीतून समोर येताना दिसते.दलितसमाजातील विधवा आणि परितक्त्या स्त्रियांकडेसमाजाची पाहण्याची घाणेरडी नजर आणि या सर्व गोष्टींचा सामना करत, संघर्ष

करत जगणाऱ्या अनेक स्त्री-व्यक्तिरेखा दलित कादंबरीतून समोर येतात. मांग, गारुडी, कोल्हाटी, डोंबारी अशा समाजातील अनेक स्त्री-व्यक्तिरेखा शोषणाच्या बळी झालेल्या दिसतात.तरकाही दलित कादंबरीतून स्त्री-व्यक्तिरेखा स्वाभिमानाने लढताना, संघर्ष करताना, प्रतिकारकरताना दिसतात. बहुतांश दलित कादंबरीत येणाऱ्या दलित स्त्री-व्यक्तिरेखा ह्या शोषित, वंचित, उपेक्षित जीवन वाट्याला आलेल्या, काबाडकष्ट करणाऱ्या, लैंगिक शोषण झालेल्या जीवनाची परवड झालेल्या दिसून येतात. दलित कादंबरीत येणाऱ्या स्त्री-व्यक्तिरेखा सामाजिक संघर्ष करत प्रस्थापित व्यवस्थेच्या त्या बळी ठरलेल्या आहेत.तरीही दलित कादंबरीत येणाऱ्या स्त्रीया ह्या परिस्थितीने गरीब आहेत पण लाचार नाहीत, स्वाभिमानाने मरण पत्करणाऱ्या या स्त्री-व्यक्तिरेखा आपले शील जपताना दिसतात.आपल्या तत्त्वांशी आणि नीतिमत्तेशीकोणत्याही परिस्थितीत त्या तडजोडकरीत नाहीत.आपल्याकडे असणारे चारित्र्य हीच आपलीखरीसंपत्ती आहे.हा आशावाद त्यांच्या ठायीकायम आहे.म्हणूनच दलित कादंबरीतून येणाऱ्या बहुतांश स्त्री-व्यक्तिरेखा कितीही वाईट परिस्थिती आलीतरी प्रस्थापित व्यवस्थेच्या प्रलोभनाला त्या बळी पडत नाहीत.याविषयी ज्योती लांजेवार आपलीभूमिका मांडताना म्हणतात, "मराठी दलित कादंबरीत झ ालेलेस्त्रीचित्रण दलितस्त्रीच्या अपेक्षा उंचावणारे आहे.ते भोवतालचा अंधार दूर सारुन स्वतःच्या अस्तित्वाचा शोध घेणारे आहे. असभ्य जगात राहूनही सभ्यता जपणारे आहेत. नीतिमत्तेच्या गोष्टी न करताहीसंस्कृती, नैतिकता जपणारे आहे.पोटासाठीकष्ट करावेत पण गुलामी, लाचारी नसावी हा मूलमंत्र जपणारे आहे."[३] (पृ.क्र. ६२)

दलित कादंबरीतून येणाऱ्या स्त्री-व्यक्तिरेखा ह्या दलित समाजाचा सांस्कृतिक इतिहाससमोर आणतात. अंधश्रध्दा, कर्मकांड यांच्या विळख्यातून बाहेर पडण्यासाठी त्या आत्मशोध घेताना दिसतात. डॉ.आंबेडकरांना प्रेरणा मानून शिक्षणातून आपल्या कुटूंबासाठी, समाजासाठी झगडताना दिसतात. डॉ.आंबेडकरांनी दिलेल्या अधिकारांचा व्यवहारात उपयोगकरताना दिसतात. आपणही माणूस आहोत आणि आपल्यालाही इतर पुरुषांसारखा नैसर्गिकसमानतेचा अधिकार आहे याची जाणीव त्यांच्या ठायी दिसून येते.अन्याय करणारांपेक्षाअन्याय सहनकरणाराखूप मोठागुन्हेगार असतो.हे आंबेडकरी तत्त्वज्ञान सोबत घेऊन त्या जगताना दिसतात. आंबेडकरी चळवळीत पुरुषांप्रमाणेच त्याही मोठ्या प्रमाणात सहभागी झालेल्या दिसतात. हिंदू समाजव्यवस्थेतील त्यांचे असणारे दुय्यम स्थान त्या त्वेषाने नाकारतात आणि बंडखोरी करुन विद्रोहाची भाषा बोलताना त्या दिसतात.नैतिकता, चारित्र्य, मानवी मूल्य यांचेपराकोटीचेसंगोपन त्या करताना दिसतात.दलित कादंबरीतून येणाऱ्या स्त्री आणि पुरुष व्यक्तिरेखा ह्या दलित कादंबरीच्या आशय-विषयाचा अविभाज्य भाग ठरलेल्या दिसतात.त्यामुळेच दलित कादंबरीतील वास्तवाचे आणि जिवंतपणाचे अधिष्ठान प्राप्त झालेले दिसते.

## निष्कर्ष :

१) दलित कादंबरीतील व्यक्तिरेखा ह्या दलितसमाजाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात.
२) दलित कादंबरीलतील व्यक्तिरेखा काल्पनिक न वाटता त्या जिवंत वाटतात.
३) दलित कादंबरीलतील व्यक्तिरेखांवरती डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव पडल्याचे दिसून येते.
४) दलित कादंबरीलतील व्यक्तिरेखा दलितसमाजाचे दुःख, वेदना, विद्रोह प्रतिनिधिक स्वरुपात मांडताना दिसतात.
५) दलित कादंबरीलतील व्यक्तिरेखा ह्या आशावादी आणि जीवनाकडे सकारात्मक दृष्टीने पाहणाऱ्या आहेत.

## संदर्भ :


१) ढगेसुशीला, 'मराठी दलित कादंबरीची अभिनव वाटचाल', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००४, पृ.क्र. १८९
२) लांजेवार ज्योती, 'मराठी दलित कादंबरीतील स्त्री-चित्रण', सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २००८, पृ.क्र. ११
३) तत्रैव, पृ.क्र. २६२
४) काळे विलास, "दलित कादंबरी आशय आणि आविष्कार", सुगावा प्रकाशन, पुणे, प्र.आ. २०११, पृ.क्र. १५४
५) साठे अण्णाभाऊ, 'फकिरा' सुरेश एजन्सी, बावन्नावी आवृत्ती २०२२, पृ.क्र. ५५